दै. सकाळ (7)

# ८२ आक्षेप, हरकतींवर झाली सुनावणी...

## महापालिका निवडणूक ; ता. दहा ऑगस्टपर्यंत निर्णय होणार

**नांदेड, ता. २८ (बातमीदार)** : प्रभागाचे नाव बदला, प्रभाग रचना करताना रस्ते, गल्ली, नगर अर्धवट तोडण्यात आले. आरक्षणचा निर्णय चुकीचा ठरला. मतदारांची संख्या कमी जास्त झाली. सुनावणी इन कॅमेराऐवजी खुल्या सभागृहात व्हावी या व इतर ८२ आक्षेपांवर महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात शुक्रवारी (ता. २८) दिवसभर सुनावणी घेण्यात आली. आता या सुनावणीवर येत्या ता. दहा ऑगस्टपर्यंत राज्य निवडणूक आयोग निर्णय देणार आहे.

नांदेड महापालिकेच्या निवडणुकीसाठी काढण्यात आलेल्या प्रभाग रचना व आरक्षणाच्या सोडतीसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या ८२ आक्षेप आणि हरकतींवर शुक्रवारी (ता. २८) सुनावणी घेण्यात आली. त्यासाठी मुंबईहून प्राधिकृत अधिकारी म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सदस्य सचिव संतोष कुमार उपस्थित होते. तसेच आयुक्त गणेश देशमुख, निवडणूक विभागाचे उपायुक्त संतोष कंदेवार, सहायक आयुक्त गुलाम सादेख, माधवी मारकड उपस्थित होते.

महापालिकेची येत्या आक्टोबर महिन्यात निवडणूक होत असून त्यासाठी सोमवारी (ता. १०) प्रभाग रचना व आरक्षण काढण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना मंगळवारी (ता. ११) शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली व त्यावर हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार नऊ दिवसांत ८२ आक्षेप व हरकती दाखल झाल्या होत्या. त्यावर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून सुनावणीस सुरवात झाली.



**नांदेड : महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना व आरक्षणाच्या सोडतीसंदर्भात शुक्रवारी प्राधिकृत अधिकारी संतोष कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली.**

सुनावणीसाठी १५ गट तयार करण्यात आले होते व त्यांना वेळ देण्यात आला होता. त्यानुसार दुपारी चार वाजेपर्यंत सर्व सुनावणी घेण्यात आल्या. प्रत्येकाला आपले म्हणने मांडण्यासाठी वेळ देण्यात आला. आक्षेप दाखल करणाऱ्यांमध्ये माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला,

पान ३ वर »

# ८२ आक्षेप, हरकतींवर झाली सुनावणी...

» पान १ वरून

शिवसेनेचे महानगरप्रमुख बाळू खोमणे, नगरसेवक किशोर भवरे, सय्यद जानीमियाँ, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या महानगराध्यक्षा कृष्णा मंगनाळे, माजी जिल्हाप्रमुख प्रकाश मारावार, माजी नगरसेवक मुकुंद जवळगावकर, अब्दुल सत्तार, जफरअलीखान पठाण आदींचा समावेश होता. या वेळी निवडणूक विभागाचे कर्मचारी अख्तर इनामदार, मोहंमद युनूस, संतोष जोशी, धम्मपाल प्रधान, अजय गायकवाड, असदउल्ला खान, रामकृष्ण भांगे, दिलीप वंदने, सखाउल्लाखान, महेश नागुल, ओमप्रकाश पिटलोड, राजेश कन्हाळे, भीमा लोकरे आदींनी सहकार्य केले.

**निवडणूक आयोग घेणार निर्णय**

प्रभाग रचना व आरक्षणावर झालेल्या सुनावणीनंतर आता प्राधिकृत अधिकारी संतोष कुमार हे त्यांचा अहवाल ता. पाच ऑगस्टपर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सादर करतील. त्यानंतर आयोग त्यावर ता. दहा ऑगस्टपर्यंत निर्णय देईल. त्यानंतर ता. १२ ऑगस्ट रोजी राज्य निवडणूक आयोगाकडून आलेल्या निर्णयानंतर त्यास राजपत्रात प्रसिद्धी देण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.